ISSN 2

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE DEGLOOR
Dist.Nanded

# २१ व्या शतकात गांधीविचारांची प्रस्तुतता



साहित्यक्षुधा
विशेषांक-२०१७.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

| अ.क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|---|
| २१. | महात्मा गांधीचे महिला सबलीकरणाविषयी विचार | डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव | ९२ |
| २२. | म. गांधीजीचे धर्मनिरपेक्ष राजकारण व वर्तमान स्थिती | डॉ. राजेंद्र ज्ञानोबाराव शिंदे | ९५ |
| २३. | गांधीजींचा शोधबोध | गिरी निरंजनगिर गोविंदगिर | १०१ |
| २४. | महात्मा गांधीच्या ग्राम स्वराज्य विषयक विचारांची प्रासंगीकता | ममता मधुकरराव देशमुख | १०६ |
| २५. | महात्मा गांधी : स्त्री अस्मिता आणि सद्यस्थिती | कु. महिपाल पुष्पा विश्वनाथराव | १०९ |
| २६. | म. गांधींच्या विचारांची २१ व्या शतकात प्रस्तुतता | मेहत्रे दत्ताजी हुलप्पा | ११२ |
| २७. | एकविसाव्या शतकात महात्मा गांधी यांच्या विचाराची प्रासंगिकता | मुसळे अविनाश गंगाधर<br>डॉ. सौ. कल्पना कदम | ११४ |
| २८. | महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांची प्रासंगीकता | मेघा शरदचंद्र पाठक | ११७ |
| २९. | आजच्या काळात गांधीजीच्या मुल्यविषयक विचारांची प्रस्तुतता | डॉ.शिवाजी सोमला पवार | ११९ |
| ३०. | गांधीविचारातील अहिंसा आणि दहशतवाद | डॉ. पी. डी. सूर्यवंशी | १२५ |
| ३१. | महात्मा गांधीचे विचार व २१ वे शतक | प्रा. सुर्यकांत माधवराव सांभाळकर | १२८ |
| ३२. | २१ व्या शतकात गांधी विचारांची प्रासंगीकता | प्रा. राठोड डी. बी. | १३१ |
| ३३. | स्वतंत्र भारत में अनुसूचित जातियों का उत्थान : डॉ.बाबासाहेब अम्बेडकर – म.गांधी के दृष्टिकोन | प्रा.रामचंद्र गायकवाड | १३३ |
| ३४. | २१ व्या शतकात 'गांधीवाद'ची प्रासंगिकता | प्रा.डॉ. शिंदे आर.डी. | १४५ |
| ३५. | एकविसाव्या शतकातील भारताच्या विकासासाठी गांधीवादी विचारांची आवश्यकता | प्रा.डी.के. मगर | १५१ |
| ३६. | महात्मा गांधींची ग्रामविकासाची संकल्पना : एक अवलोकन | प्रा.सकनुरे सूर्यकांत लक्ष्मण | १५५ |
| ३७. | महात्मा गांधी तत्त्वज्ञान आणि भारतीय लोकशाही | प्रा. डॉ. बी. एम. नरवाडे | १५७ |
| ३८. | महात्मा गांधींचे विचार आणि २१ वे शतक | श्री डॉ.डोंगरे एल.बी. | १६१ |
| ३९. | महात्मा गांधीजी व ग्रामीण विकास: एक दृष्टिक्षेप | प्रा.डॉ.लांडगे पंडित शिवराम | १६४ |
| ४०. | २१ व्या शतकात गांधी विचाराची प्रस्तुतता | प्रा.डॉ.मीरा विठ्ठलराव फड | १६७ |
| ४१. | एकविसाव्या शतकातील मानवतेचा दिपस्तंभ महात्मा गांधीजींचे तत्त्वज्ञान | प्रा.डॉ.बी.आर.कत्तुरवार | १६९ |
| ४२. | म.गांधीची स्वराज संकल्पना व सद्यस्थिती | प्रा.डॉ.डी.एम. कुंचेलवाड | १७१ |
| ४३. | आजच्या परिस्थितीत 'ग्रामस्वराज्याची' उपयुक्तता | डॉ.माधव जाधव | १७४ |


****



ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE DEGLOOR ★ Dist.Nanded ★

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

# एकविसाव्या शतकातील मानवतेचा दिपस्तंभ महात्मा गांधीजींचे तत्त्वज्ञान

- प्रा.डॉ.बी.आर.कस्तुरवार,
विभाग प्रमुख व समन्वयक
पदव्युत्तर लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्र,
देगलूर महाविद्यालय देगलूर जि.नांदेड

एकविसावे शतक हे ज्ञान विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड क्रांती घडवून आणलेले शतक असून या शतकात विज्ञानाने माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नेत्रदिपक क्रांती घडवून आणली आहे. भौतिक साधन सामुग्रीची जमवाजमव करण्यातच संपूर्ण आयुष्य खर्ची करणाऱ्या मानवाला जोपर्यंत गांधीजीचे विचार, कार्य व तत्वज्ञान कळणार नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने मानवी जीवनात आनंद निर्माण होऊ शकत नाही. अर्थात त्यासाठी स्वच्छ मनाने गांधीजीचे विचार आणि कार्य समजून घेणे आवश्यक आहे. आज एकविसाव्या शतकात देखील सेवाग्राम (जि.वर्धा, महाराष्ट्र) येथे संवेदनशील मन आणि अंत:करण घेवून अभ्यासक भेट दिल्यास आजच्या पिढीला खरे गांधीजी समजतील. या शतकातील पिढीने प्रत्यक्ष महात्मा गांधीना पाहिलेलं नाही तर केवळ चित्रपटाच्या माध्यमातून किंवा शाळा - महाविद्यालयातील अभ्यासक्रमातून गांधीजीना समजून घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. अर्थात या ठिकाणी खेदाने नमूद करावे वाटते की, गांधीजीच्या समवेत कार्य केलेल्या राम मनोहर लोहीया, पंडित नेहरु, मौलाना आझाद यांनी लिहीलेल्या पुस्तकातील गांधीजीच्या जीवनातील अनेक प्रसंग वाचण्याकडे देखील एकविसाव्या शतकातील पिढीने दुर्लक्ष केलेले दिसून येते.

आज समाज सेवा किंवा सामाजिक कार्य (Social Work) या गोंडस नावाखाली विविध स्वरुपाची कामे करुन अनुदान लाटण्यासाठी अनेक एन.जी.ओ. निर्माण होत आहेत. धर्मदाय आयुक्तांच्या कार्यालयात विश्वस्त संस्था किंवा सेवाभावी संस्था स्थापन करणाऱ्यांची संख्या प्रचंड झपाट्याने वाढली आहेत. यातील संस्थेच्या पदाधिकारी व सदस्यांना ट्रस्टी अथवा विश्वस्त या संकल्पनेचा अर्थ देखील माहित नसतो त्यांना महात्मा गांधीजींनी विश्वस्तांची संकल्पना समजवीणे आवश्यक आहे. आपल्याकडे दुसऱ्या व्यक्तीने एखादी वस्तु, दागीने सांभाळायला ठेवली तर ती वस्तु किंवा दागीने आपण दुसऱ्याची ठेव मानतो. मोठया विश्वासाने व कसोशीने ते दागीने अथवा वस्तू सांभाळून ठेवतो. ज्यांच्याकडे वस्तु, पैसे अथवा संपत्ती ठेवली जाते तो विश्वस्त किंवा ट्रस्टी होय. ज्यास सामान्यत: भरवशाचा माणूस म्हटले जाते. तर सांभाळण्यासाठी दिलेली वस्तु, जागा किंव संपत्ती म्हणजे ट्रस्ट होय. ट्रस्टी किंवा विश्वस्त हा त्या संस्थेचा किंवा संपत्तीचा मालक नसतो तर तो संरक्षक किंवा पालनकर्ता असतो. म.गांधी दि. ३१ जुलै १९३७ च्या हरिजन पत्रिकेत ते असे लिहितात की, By

education, I mean un all round drawing out the best in child and man body, mind and spirit. literacy is not the end of the education, nor even the begining, it is only one of the means whereby, man and women can be cducated. Litcracy in itself is no education याचा अर्थ शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्व क्षमतांचा सर्वांगीन विकास करणे होय. म.गांधीना शिक्षणातून विद्यार्थ्यांचा केवळ बौध्दीक विकास नव्हे तर शारीरिक, भावनिक, नैतिक आणि क्रियात्मक विकास करणे अपेक्षित होते. ते म्हणतात True education is that which draws not and simulates the spiritual, intellectual and physical facities of children. मं. गांधीच्या मते, विद्यार्थ्यांचे डोके म्हणजे रिकामे खोके नव्हे कि जे हवे ते त्यात कोंबावे किंवा विद्यार्थी म्हणजे मातीचा गोळा नव्हे की त्याला हवा तो आकर द्यावा. विद्यार्थी जेंव्हा जन्माला येतो तेंव्हा काही समज प्रवृत्ती घेवून येतो. त्यामुळे त्याला सहप्रवृत्ती ओळखून त्याचा विकास करणे म्हणजे शिक्षण होय. त्यांच्या मते शिक्षण म्हणजे, जीवनातील उच्च मूल्ये संपादन करण्याचे साधन होय. म्हणून त्यांनी शिक्षणात साक्षरता किंवा शास्त्राच्या ज्ञानापेक्षा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला अधिक महत्व दिलेले आहे. त्यामुळे त्यांनी बालकेंद्रीत व जीवनकेंद्रीत शिक्षणाचा पुरस्कार केलेला आहे. त्यांच्या मते शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांचा हात, डोके व ऱ्हदयाचा विकास करणे होय. म.गांधी म्हणतात, शिक्षणाद्वारे सत्याचे व पवित्र अंतकरणाचे दर्शन घडवावे. त्यांच्या मते Your education is absolutely worthless if it is not buiilt on a solid foundation of truth and purity शिक्षणाद्वारे चांगले काय आणि वाईट काय याचे ज्ञान आम्हाला होऊ शकते. म्हणून जे शिक्षण आम्हाला असे ज्ञान प्राप्त करुन देऊ शकत नाही ते शिक्षण नसून आत्मप्रतारणाच होय. व्यक्तीला रोजगाराची संधी उपलब्ध करुन देऊ शकते, विविध स्वरुपाची व्यावसायिक क्षमता प्राप्त करुन देऊ शकते तेच खरे शिक्षण होय.

**सारांश :**

एकविसावे शतक हे मानवाच्या उन्नतीचे व उत्कर्षाचे शतक असले तरी मानवाने केलेल्या प्रगतीला जोपर्यंत नितीचे अधिष्ठान असणार नाही तोपर्यंत केलेली उन्नती पूर्ण होवू शकत नाही. आज मानवता, माणूसकी व नैतिकता या आदर्श मानवी मूल्यांची मोठ्या प्रमाणात अवहेलना होत आहे. या बिकट व भोगवादी चक्रातून मानवी जीवन सुरक्षीत ठेवायचे असेल तर गांधीजीच्या पाऊलावर पाऊल टाकणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे जात्याच्या खुंटीला धरुन असणारे मुठभर दाने जात्यात भरडले जात नाहीत व त्यांचे पीठ देखील होत नाही त्याप्रमाणे एकविसाव्या शतकात ज्या व्यक्ती गांधी विचार व भगवद्गीतेतील विचाराला अनुसरुन जीवन जगत आहेत. त्यांचे जीवन सुखी, समाधनी व संपन्न बनू शकते.

गांधीजींच्या विचाराप्रमाणे भारतातील प्रत्येक खेड़ेगाव स्वयंपूर्ण, स्वावलंबी व स्वयंशासीत बनल्यास खऱ्या अर्थाने शेतकरी आत्महत्येसारख्या गंभीर समस्या देखील संपूदात येवू शकतात. अर्थात गांधीजींचे तत्वज्ञान ऐकण्यासाठी, वाचण्यासाठी, पाहण्यासाठी व चर्चा करण्यासाठी खूप आदर्श व चांगले वाटत असले तरी जोपर्यंत ते विचार प्रत्येक व्यक्तीच्या वाणी, वर्तन व विचारात दिसणार नाहीत तोपर्यंत एक महासत्ताक राष्ट्र म्हणून भारताचा उदय होणार नाही.

**संदर्भ :**

१. हरिजन पत्रिका , ११ सप्टेंबर १९३७
२. कुंभार नागोराव (संपादीत) म.गांधी विचार दर्शन, प्रबोधन प्रकाशन लातूर.
३. माशेलकर रघुनाथ (संपा) अखंड प्रेरणा गांधी विचारांची.
४. गांधी मो.कं., माझ्या स्वप्नातील भारत, (२०१०) परधाम प्रकाशन वर्धा.
५. गांधी मो.क., हिंद स्वराज्य, नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद.
६. गांधी मो.क., रचनात्मक कार्यक्रम (२०१०) नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद.
७. गांधी मो.क., सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, (२००६) नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद.

****

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded